आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ मार्च २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारची मंजुरी

- संगमनेर तालुक्यात १२ वर्षांच्या मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करायचे राज्य शासनाचे आदेश

- स्वयंअर्थसहाय्यित शाळांची स्थापना आणि विनियमन करणाऱ्या विधेयकाला विधान परिषदेची मंजुरी

- इंदूरमध्ये इलेक्ट्रिक चार्जिंग पॉईंटच्या स्फोटात एकाच घरातल्या ७ जणांचा मृत्यू, केंद्र सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- राज्याच्या बहुतांश भागात आज वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**<><><><><>**

व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. त्यामुळं या ग्राहकांना आता मासिक वापराच्या सरासरीच्या ३० टक्के एलपीजी मिळेल. अधिकाधिक व्यावसायिक ग्राहकांनी एलपीजी ऐवजी पाइप गॅसचा वापर करावा यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन पेट्रोलियम सचिवांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून केलं आहे.

**<><><><><>**

राजकारणात सक्रीय असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात कधीच पूर्णविराम नसतो, त्यामुळे कार्यकाळ संपल्यानं राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांनीही यापुढेही देशहितासाठी कार्यरत रहावं, असं आवाहन  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी

आज केलं. राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या ५९ सदस्यांना आज निरोप देण्यात आला त्यावेळी तेबोलत होते.

राज्यसभेतून निवृत्त होणारे एच. डी. देवेगौडा, मल्लिकार्जुन खर्गे आणि शरद पवार यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी आपल्या आयुष्यातील अर्ध्याहून अधिक काळ संसदीय कार्यासाठी समर्पित करत नवीन खासदारांसमोर निष्ठा आणि समाजसेवेचा एक आदर्श घालून दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी दिलेलं योगदान वाखाण्याजोगं असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक धोरणाशी संबंधित कायदेशीर बाबींची तपासणी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचा कार्यकाळ यंदाच्या पावसाळी अधिवेशनापर्यंत वाढवण्यात आला आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत ही मुदतवाढ असेल. या समितीचे सदस्य पी. पी. चौधरी यांनी संविधानाच्या १२९व्या दुरुस्ती विधेयक, २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक २०२४अन्वये आज लोकसभेत हा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

**<><><><><>**

संगमनेर तालुक्यात १२ वर्षांच्या मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करायच्या सूचना पोलीस प्रशासनाला देण्यात आलेल्या आहेत, असं आश्वासन गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिलं. ॲसिड सहज उपलब्ध होऊ नये, यासाठी समिती स्थापन करून उपाययोजना करण्यात येतील, असं आश्वासन भोयर यांनी दिलं. विधान परिषदतेल्या इतर कामकाजाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - व्हाइस कास्ट - -**

*(स्वयंअर्थसहाय्यित शाळांची स्थापना आणि विनियमन करणाऱ्या विधेयकाला विधान परिषदेनं आज मंजुरी दिली. कालच विधानसभेची याला मंजुरी मिळाली होती. राज्यातल्या सार्वजनिक विश्वस्त*

*संस्थांप्रमाणेच देशपातळीवरच्या चांगल्या संस्थांच्या स्वयंअर्थसहाय्यित शाळांना याद्वारे परवानगी मिळणार आहे. अचानक शाळा बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांचं होणारं नुकसान टाळण्यासाठी आगाऊ नोटिशीचा काळ १८ महिन्यांवरून दुप्पट करणं आणि ५ ते १० लाख रुपयांचा दंडही दुपटीने वाढवणं इत्यादी तरतुदी या विधेयकात आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ दुसरी सुधारणा विधेयक तसंच महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक, २०२६ देखील आज विधानपरिषदेत मंजूर झालं.*

*प्लॅस्टिक किंवा तत्सम फुलांवर बंदी घालणारी विशेष अधिसूचना काढली जाईल, वेगळी यंत्रणा तयार केली जाईल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधान परिषदेत दिलं. अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करायचे अधिकार महानगरपालिकांना दिले जातील. तसंच, अशा फुलांचा वापर सजावटीसाठी करणाऱ्या मंगल कार्यालयांवरही कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले. प्लॅस्टिकच्या फुलांच्या विक्रीवर बंदी घातल्यासंदर्भातला प्रश्न आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला होता.*

*दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या निवासस्थानाजवळ झालेल्या गोळीबाराप्रकरणी एकंदर १२ जणांना अटक केली असून त्यांच्यावर मकोका लावण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईला कोणत्याही परिस्थितीत टोळीयुद्धाकडे जाऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी विधानपरिषदेत मिलिंद नार्वेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली.*

*राज्यातल्या विविध अभ्यासक्रमांसाठी मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीतला केंद्र सरकारचा वाटा थेट त्या त्या संस्थांच्या खात्यात जमा करता येईल का, याबाबत केंद्राला विनंती केली आहे, लवकरच याबाबत केंद्राच्या समितीबरोबर बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढू, असं आश्वासन संजय शिरसाट यांनी आज विधानपरिषदेत दिलं. सध्या हे पैसे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होत असून ते पैसे वेळेवर शैक्षणिक संस्थांना मिळत नाहीत, त्या संस्थांचा तगादा सुरू होतो, त्यांच्या कागदपत्रांसाठी अडवणूक केली जाते, याबाबत आमदार किशोर दराडे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी विधान परिषदेतून अंकिता आपटे)*

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात एका बारा वर्षीय मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याचा मुद्दा काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून उपस्थित केला. याच विषयावर बोलू देण्याची मागणी नाना पटोले यांनी केली. मात्र अध्यक्षांनी त्यांना परवानगी नाकारली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी काही

सदस्यांना बोलू देण्याचा आग्रह धरला. यावर पोलिसांना योग्य ते निर्देश दिल्याचं अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं.

<><><><><>

मध्य प्रदेशात इंदूर इथे आज पहाटे इलेक्ट्रिक कार चार्जिंग पॉईंटचा स्फोट झाल्यामुळे लागलेल्या आगीत एकाच घरातल्या ७ जणांचा मृत्यू झाला. इंदूरमध्ये ब्रजेश्वरी ॲनेक्स संकुलात ही दुर्घटना घडली आहे. या चार्जिंग पॉईंटवर इलेक्ट्रिक गाडींच चार्जिंग सुरू होतं. मात्र, स्फोट झाल्यामुळे गाडीला आग लागली. चार्जिंग पॉईंट ज्या घराजवळ होता, त्या घरातल्या गॅस सिलिंडरचाही स्फोट झाल्यामुळे आग आणखी भडकली. या स्फोटानंतर एक लहान मूल बेपत्ता असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या आगीतून तीन जणांना वाचवण्यात यश आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, दिल्लीत पालम परिसरातल्या एका बहुमजली इमारतीला आग लागल्यामुळे सात जणांचा मृत्यू झाला आहे. अग्निशमन दलाच्या ३१ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या दोन्ही दुर्घटनांबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं असून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदतनिधीतून मृतांच्या कुटुंबाला प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे.

<><><><><>

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. एकूण ४०० कंत्राटी कर्मचारी होते. त्यापैकी ५० कर्मचारी नोकरी सोडून गेले होते तर ११ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सेवेत कायम करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाच्या निर्णयाचा फायदा सर्वच्या सर्व ३५० कंत्राटी कर्मचाऱ्यांना

होणार आहे. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयानं  पात्र याचिकाकर्त्यांना सेवेत सातत्य राखून स्थायित्व देण्याचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

भोंदूगिरी करणारा स्वयंघोषित ज्योतिषी अशोककुमार एकनाथ खरात याला नाशिक पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे. एका पिडित महिलेनं  त्याच्याविरुद्ध सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या लैंगिक अत्याचाराच्या तक्रारीवरून बलात्काराचा गुन्हा  खरातविरुद्ध नोंदवून मध्यरात्री त्याला अटक करण्यात आली.

<><><><><>

अकोला जिल्ह्यात मुर्तिजापूर तालुक्यामध्ये मुरंबा गावातल्या जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी केंद्रातल्या विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी सुमारे ६५ हजार रुपये किमतीची बायोगॅस यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

<><><><><>

राज्याच्या बहुतांश भागात आज वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागानं दिली आहे. काही ठिकाणी गारपीट आणि वीजांचा कडकडाट होण्याचीही शक्यता आहे. राज्याच्या सुमारे अर्ध्याहून अधिक जिल्ह्यात  मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांचा यात समावेश आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भाचा उत्तर भागात यलो अलर्ट आहे.

सोलापूर जिल्ह्यातही काल रात्री पाऊस झाला. अक्कलकोट तालुक्यातल्या अनेक गावात गारांचा पाऊस पडला.  द्राक्ष, डाळींब, केळी, आंबा या पीकांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

धाराशिव जिल्ह्यातल्या उमरगा तालुक्यात काही भागात काल रात्री गारांचा पाऊस झाल्यानं ज्वारी आणि गव्हाच्या पीकाचं नुकसान झालं. कांदा,गहू, करडी, पपई आणि ज्वारीच्या पिकाला या गारपिटीचा सर्वाधिक फटका बसला आहे. नळदूर्गजवळ राष्ट्रीय महामार्गावर गारांचा खच पडल्यानं वाहतूक विस्कळीत झाली होती.

लातूरमध्येही काल अवकाळी पाऊस झाला. निलंगा तालुक्यात गारपीट झाली. रब्बी पिकांसोबतच आंबा बागांनाही या गारपिटीचा मोठा फटका बसला आहे. परभणीतही अवकाळी पाऊस झाल्यानं गहू,ज्वारी,हळद पिकांसह टरबुज,खरबूज , पपई, केळी पिकांना फटका बसला.

सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यात अनेक भागात रात्री गारपीट, वादळी वारा आणि मेघगर्जनेसह पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला.

**//<><><><><>//**